**''भाग अ''**

| | |
|---|---|
| MHWR030036822025 | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी : विक्रांत प्र. खंदारे)<br><br>(निकाल घोषित दिनांक ०१/०८/२०२५)<br><br>**नि.फौ.ख.क्र. ४७३/२०२५** |

| | | |
|---|---|---|
| पोलीस स्टेशन सेवाग्राम, पहिली खबर क्र. १०१/२०२५ | | |
| फिर्यादी | | महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी<br>सेवाग्राम पोलीस स्टेशन. |
| सरकार तर्फे विधीज्ञ | | श्रीमती आर. आर. तिवारी,<br>श्रीमती आर. आर. होनमाने |
| आरोपी | | २. देवाशिष मेघनाथ सरकार,<br>वय : ४१ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. दमदम नगीरबाजार, दिल्ली रोड, (वेस्ट बंगाल) |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. जाहिद अली, श्री. सावरकर,<br>श्रीमती भगत व श्रीमती गडपाल. |

**''भाग ब''**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | दि. १०/०२/२०२५ ते दि. ११/०२/२०२५ |
| प्रथम खबरी अहवाल नोंदविल्याची तारीख | दिनांक ११/०२/२०२५ |
| दोषारोप/अर्ज/तक्रार दाखल तारीख | दिनांक १३/०५/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | दिनांक ०७/०७/२०२५ |
| पुरावा प्रारंभ होण्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णयास राखून ठेवण्याची तारीख | दिनांक ०१/०८/२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल | निरंक |

<u>आरोपींचा तपशील</u>

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमिनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | दोषी किंवा निर्दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.कलम ४२८ नुसार खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | देवाशिष मेघनाथ सरकार | ११/०२/२०२५ | १८/०२/२०२५ रोजी अर्ज मंजुर परंतू, जामीन दिला नाही. | भा.न्या.सं. चे कलम ३३१(४), ३०५(अ) व ३(५) | दोषी | होय | दि. ११/०२/२०२५ ते आजपर्यंत |

**''भाग क''**

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | निरंक | ... | ०१ |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे निशानी ची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

ड) मुददेमालाचे वर्णन

| क्रमांक | मुददेमाल / अर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक ०१/०८/२०२५ )

प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये आरोपी भारतीय न्याय संहिता (थोडक्यात भा. न्या. सं.) चे कलम ३३१(४) व ३०५(अ) सह कलम ३(५) अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात येणे प्रमाणे :

२. दिनांक १०/०२/२०२५ ते दि. ११/०२/२०२५ रोजी रात्री १०:०० ते सकाळी ५:३० वाजताच्या दरम्यान अंबरकर ले आउड, वरूड, ता. जि. वर्धा येथे प्रस्तुत आरोपीने आरोपीसोबत आपसात संगनमत करुन फिर्यादीचा भाउ पराग भोगे याचे घरी चोरी करण्याच्या उददेशाने रात्रीच्या वेळी अवैधरित्या प्रवेश करुन चोरटे गृहअतिक्रमण करून घरातील बेड रूममधील कपाटामधील नगदी ५०००/— रूपये, काळया हिरव्या रंगाचे जर्कीग, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल

आणि एक नोकीया कंपनीचा मोबाईल असा मुददेमाल चोरी केला. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन सेवाग्राम, जि. वर्धा येथे तक्रार दिली.

३. सदर फिर्यादीनुसार आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन सेवाग्राम, जिल्हा वर्धा येथे भा. न्या. सं. चे कलम ३३१(४), ३०५(अ) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा क्र. १०१/२०२५ नोंदविण्यात आला. तपासाअंती पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, सेवाग्राम यांनी आरोपींविरूध्द सदर गुन्हयांकरिता न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. न्यायालयात दोषारोपपत्र सादर झाल्यानंतर दिनांक ०७/०७/२०२५ रोजी आरोपींविरूध्द नि.क्र. ०३ वर भा. न्या. सं. चे कलम ३३१(४) व ३०५(अ) सह कलम ३(५) अन्वयेच्या गुन्हयाकरीता दोषारोप नोंदविण्यात आला. आरोपींचे प्रतिकथन अनुक्रमे नि.क्र. ०४ ते ०६ वर स्वतंत्र नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपींनी त्यांना सदरचे गुन्हे कबूल नसल्याचे निवेदन केले. त्यानंतर आरोपी क्र. २ देवाशिषने व्ही.सी.व्दारे त्याला सदर गुन्हे कबूल असल्याचे कळविल्याने त्याचे प्रतिकथन नि.क्र. ०७ वर कारागृहामार्फत नव्याने नोंदविण्यात आले. तसेच त्याबाबत आरोपीची आज दि. ०१/०८/२०२५ रोजी व्ही.सी.द्वारे खात्री करण्यात आली.

## कारणमीमांसा व निष्कर्ष

५. प्रस्तुत प्रकरणात आरोपी भा. न्या. सं. चे कलम ३३१(४) व ३०५(अ) सह कलम ३(५) च्या खटल्यास सामोरे जात आहे. आरोपी क्र. २ विरूध्द दोषारोप नोंदविल्यानंतर त्याने त्याला सदर गुन्हे कबुल असल्याचे निवेदन नोंदविले आहे. आरोपी स्वमर्जीने, कोणत्याही दडपणाखाली न येता गुन्हा कबुल करीत असल्याची खात्री करून त्याचे गुन्हा कबुलीचे प्रतिकथन मान्य करण्यात येते. त्यानुसार आरोपी क्र. २ देवाशिष यास भा. न्या. सं. चे कलम ३३१(४) व ३०५(अ) सह कलम ३(५) अन्वये दोषी ठरविण्यात येते.

६. विद्वान सहाय्यक सरकारी वकील, आरोपी व त्याचे विद्वान वकील यांचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने निवेदन केले आहे की, तो त्याच्या घरामध्ये एकटाच कमावता असून कुटूंबाची सर्वस्व जबाबदारी त्याच्यावर आहे. तसेच तो अत्यंत हलाखीचे जीवन जगत असून त्याला रोजगाराची आबाळ आहे. त्याउलट विद्वान सरकारी वकीलांनी समाजाला संदेश मिळणेसाठी आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

७. अभिलेखावरील दोषारोप पत्रातील नोंदीनुसार प्रकरणात चोरी गेलेल्या जर्किंग व्यतिरिक्त इतर सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. आरोपीवर सिध्द झालेला गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. त्यामुळे तो अपराधी परिवीक्षा अधिनियमाचा लाभ मिळण्यास पात्र नाही. परंतु दोषारोप पत्रातील नोंदीनुसार आरोपी दि. ११/०२/२०२५ पासून न्यायबंदी आहे. त्यामुळे आरोपीने स्वत:हुन गुन्हा कबुल केल्याने, त्याने सादर केलेल्या कारणांना अनुसरून आणि गुन्हयाचे स्वरूप व दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. आरोपी देवाशिष मेघनाथ सरकार यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २६४ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम ३३१(४) सह कलम ३(५)या शिक्षापात्र गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येवून त्याकरिता त्यास ०६ महिन्यांचा कठोर कारावास आणि रूपये १,०००/— द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्यदंड न भरल्यास ०२ दिवसांचा अतिरीक्त कारावास भोगावा.

२. आरोपी देवाशिष मेघनाथ सरकार यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २६४ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम ३०५(अ) सहकलम ३(५)या शिक्षापात्र गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येवून त्याकरिता त्यास ०६ महिन्यांचा कठोर कारावास आणि रूपये १,०००/— द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्यदंड न भरल्यास ०२ दिवसांचा अतिरीक्त कारावास भोगावा.

३. आरोपी दि. ११/०२/२०२५ ते आजपर्यंत कोठडीमध्ये असल्याने आरोपीने भोगलेली सदर शिक्षा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४६८ अन्वये त्याचेवर ठोठावण्यात आलेल्या शिक्षेतुन कमी करण्यात यावी.

४. आरोपीला देण्यात आलेल्या दोन्ही शिक्षा त्याने तो भोगत असलेल्या इतर शिक्षेंसोबत एकत्र भोगाव्यात.

५. आरोपीने दंड रक्कमेचा भरणा केल्यास अपिल कालावधीनंतर

त्यातील रुपये १,०००/— फिर्यादीला नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावे.

६. या आदेशाची एक प्रत आरोपीला त्वरीत विनामुल्य देण्यात यावी.

७. प्रकरण इतर आरोपींविरूध्द चालु ठेवण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित व पारित करण्यात आला.)

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2025.08.01 15:53:43 +0530

दिनांक : ०१/०८/२०२५

ठिकाण : वर्धा

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क. १)

## शेरा

या पी. डी. एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : जि. हि. जावळे,

कोर्टाचे नाव : श्री. वि. प्र. खंदारे,
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
फौजदारी न्यायालय क्र. १

पीठासीन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर
सही केलेली तारीख : ०१/०८/२०२५

न्यायनिर्णय अपलोड करण्यात
आल्याची तारीख : ०१/०८/२०२५